# मराठी पुस्तकांची ऑनलाईन 'गंगा' आता वाचकांच्या हातात!

**प्रतिनिधी**

मराठी पुस्तके जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अमेरिकास्थित 'माय विश्व' या कंपनीतर्फे सुरू करण्यात आलेल्या 'बुकगंगा डॉटकॉम' (www.bookganga.com) या संकेतस्थळाचे उद्घाटन आज मुंबईत ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर यांच्या हस्ते झाले. या संकेतस्थळावर मराठीसह भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या विविध विषयांवरील पुस्तकांची माहिती देण्यात आली असून आपल्याला हवे असेल ते पुस्तक ऑनलाईन खरेदी करण्याचीही सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

माटुंगा येथील रुईया महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेत याची माहिती देण्यात आली. या वेळी 'माय विश्व'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, 'ग्लोबल मराठी' या संकेतस्थळाचे संचालक संजय पेठे आदी उपस्थित होते.

'माय विश्व'ने मराठीसह विविध भारतीय भाषांमधील पुस्तके ॲपल कंपनीच्या आयपॅडवर वाचण्याची सुविधा 'आयबुकगंगा' या खास सॉफ्वेअरच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे.

संकेतस्थळाचे उद्घाटन केल्यानंतर आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. टिकेकर म्हणाले की, आयपॅडच्या मदतीने किंवा थेट बुकगंगा डॉट कॉम या संकेतस्थळावरून मराठी पुस्तके आपण प्रिंट किंवा ई-बुक स्वरुपात विकत घेऊ शकतो. 'आयपॅड'वर मराठी कविता, कादंबरी, कथा आदी साहित्यप्रकाराबरोबरच संदर्भग्रंथ, संस्कृतीकोश टाकण्यात यावेत.

मंदार जोगळेकर यांनी सांगितले की, सध्या या संकेतस्थळावर सात हजार पुस्तकांची माहिती देण्यात आली असून २५ प्रकाशक सहभागी झाले आहेत. संकेतस्थळावरून वाचकांना हवी ती पुस्तके ई-बुक स्वरूपात डाऊनलोड करून घेता येतील. 'आयपॅड' नसले तरी लॅपटॉप किंवा संगणकावरही ऑनलाईन पुस्तके खरेदी करता येतील.

सध्या मराठी, संस्कृत भाषेतील पुस्तके उपलब्ध असून लवकर तामिळ, तेलगु, कन्नड आणि बंगाली भाषेतील पुस्तके येथे मिळू शकतील.

माय विश्वने विकसित केलेल्या खास तंत्रज्ञानामुळे ज्याने पुस्तक विकत घेतले आहे त्यालाच ते त्याच्या संगणक, लॅपटॉप किंवा ॲपल कंपनीच्या आयपॅडवर वाचता येणार आहे. त्यामुळे पुस्तकांच्या पायरसीला आळा बसू शकेल, असा विश्वासही जोगळेकर यांनी व्यक्त केला.

जोगळेकर यांच्या या उपक्रमामुळे मराठी साहित्य व्यवहार आणि वाचन संस्कृती वाढण्यास मोठी मदत होणार आहे. मराठी पुस्तक प्रकाशकांनी या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांनी या वेळी केले. प्रारंभी संजय पेठे यांनी प्रास्ताविक केले.